


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

।। यः क्रियावान् स पण्डितः ।।

सर्वोत्कृष्टतेचा स्त्रोत असलेले विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण मंडळ

डॉ. संजयकुमार एन. दळवी
एम.एस्सी., पीएच.डी.
संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ


संदर्भ क्र. विकमं/२०१४–१५/६३०

दिनांक : ०३/१२/२०१४.

## स्मरणपत्र

प्रति,
**मा. प्राचार्य / मा. संचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

**विषय :– रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबतच्या अहवालाबाबत....**
**संदर्भ क्र. :– या कार्यालयाचे पत्र क्र. विकमं/२०१३–१४/८८९, दि. १०/०५/२०१४**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने **महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९** लागू केला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या अधिनियमांची पुरेशी माहिती किंवा त्या विषयांच्या परिणामांचे गांभीर्य नसल्यामुळे रॅगिंगच्या घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येत आहे. भविष्यात रॅगिंगच्या घटना घडू नयेत याकरिता व्यापकस्वरूपात जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी, मान्यताप्राप्त संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर अधिनियमांची माहिती करून विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगचे प्रकार प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने यापूर्वीच विस्तृतस्वरूपात वरील संदर्भिय पत्र व विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेला तक्ता आपणांस यापूर्वीच पाठविण्यात आलेला आहे.

वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर कार्यवाहीचा अहवाल व विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या सोबतच्या तक्यात नमूद केलेली माहिती सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांनी **शै. व. २०१४–१५ मधील दर सहा महिन्यांनी (प्रथम व द्वितीय सत्रामध्ये)** मा. संचालक, विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ या कार्यालयास पाठविणे बंधनकारक असून तद्नुषंगिक माहिती बाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस कळविण्यात आले आहे.

आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थेने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल **३१ जानेवारी, २०१५ पूर्वी** विद्यापीठाच्या मा. सचिव, रॅगिंग संनियंत्रण (विद्यार्थी कल्याण मंडळ) यांचे कार्यालयास पाठविण्यात यावा. याबाबत कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी.

कळावे,

4/12

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ